दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

www. sahyandrinews.com

Scan QR code to visit... Epaper Portal

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ वे • अंक २४ • Title - Code :- MAHMAR4951 • बुधवार दि.११ ऑक्टोबर २०२३ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

## राज्यातील शेतकऱ्यांसाठी आनंदाची बातमी

# नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेला मंजुरी

## २ हजारांचा पहिला हप्ता लवकरच जमा होणार

**मुंबई–**राज्यातील शेतकऱ्यांसाठी मोठी व आनंददायी बातमी समोर आली आहे. नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेच्या पहिल्या हप्त्याला मंजुरी देण्यात आली असून दोन हजारांचा पहिला हप्ता लवकरच शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होणार आहे. या योजनेसाठी १ हजार ७२० कोटी रुपयांच्या निधीस शासनाची मान्यता देण्यात आली आहे.

आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.राज्य सरकारच्या या निर्णयामुळे प्रत्येक पात्र शेतकऱ्याला राज्य सरकारकडून मिळणार वर्षाकाठी ६ हजार रुपये मिळणार आहे. एप्रिल ते जुलै २०२३ कालावधीसाठी पहिला हफ्ता शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होणार आहे. केंद्र आणि राज्य सरकारचे मिळून वर्षाला एकूण १२ हजार रुपये मिळणार आहेत. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अर्थ संकल्प मांडताना याची घोषणा केली होती.आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला आहे. एप्रिल २०२३ ते जून २०२३ या कालावधीसाठीच्या पहिल्या हप्त्याला राज्य मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. त्यामुळे आता शेतकऱ्यांच्या खात्यात लवकरच जमा होणार आहेत. यासाठी १,७२० कोटी रुपयांच्या निधीला शासनाने मान्यता दिली आहे. उपमुख्यमंत्री आणि राज्याचे अर्थमंत्री देवेंद्र फडणवीसांनी यंदाच्या बजेटमध्ये ही योजना जाहीर केली होती. या योजनेचा फायदा राज्यातील शेतकऱ्यांना होणार आहे. केंद्र सरकारच्या पंतप्रधान शेतकरी सन्मान योजना या धर्तीवर ही योजना लागू करण्यात आली आहे.

**नमो शेतकरी महासन्मान निधी नेमका काय?**
नमो शेतकरी महा सन्मान निधी ही केंद्राच्या पंतप्रधान शेतकरी सन्मान योजनेसारखीच योजना आहे.
या योजनेनुसार पात्र शेतकऱ्यांच्या खात्यावर महाराष्ट्र सरकार वर्षाला सहा हजार रुपये जमा करेल.
केंद्र सरकारकडून दर तीन महिन्याला दोन हजार रुपये शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा होतात.
याप्रमाणेच आता राज्य सरकारही दर तीन महिन्याला शेतकऱ्यांच्या खात्यावर दोन हजार रुपये जमा करेल शेतकऱ्यांच्या खात्यावर वर्षाला केंद्राचे सहा हजार आणि महाराष्ट्र सरकारचे सहा हजार रुपये असे एकूण १२ हजार रुपये जमा होतील.



# विदर्भ साहित्य संघ वरोरा शाखेतर्फे डॉ.रविंद्र शोभणे यांचा सत्कार

**वरोरा । प्रतिनिधी**

अमळनेर येथे होणाऱ्या ९७ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी डॉ. रविंद्र शोभणे नागपूरचे कादंबरीकार लेखक आणि साहित्यिक यांची निवड झाल्याबद्दल वरोरा शाखा विदर्भ साहित्य संघाच्या वतीने त्यांचा छोटेखानी पुष्पगुच्छ व पुस्तक देवून 'कवितेचे घर' शेगाव (बु) येथे पार पडलेल्या राष्ट्रीय काव्य पुरस्कार सोहळ्यात विदर्भ साहित्य संघाच्या सर्व पदाधिकारीच्यां वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.



या सत्कार सोहळ्याप्रसंगी विदर्भ साहित्य संघ नागपुरचे अध्यक्ष प्रदीप दाते, महाराष्ट्र राज्याचे शिक्षण उपसंचालक उल्हास नरड, साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त बालसाहित्यीक एकनाथ आव्हाळ ( मुंबई) 'कवितेचे घर' चे संस्थापक अभियंता श्रीकांत पेटकर, किशोर पेटकर, व महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातील सर्व नामांकित साहित्यिकांची उपस्थिती होती.विदर्भ साहित्य संघाचे सचिव प्रा. नीरज आत्राम, विदर्भ साहित्य संघाचे प्रसिद्धी प्रमुख आचार्य पुरस्कार प्राप्त परमानंद तिराणिक, उपाध्यक्ष सिमा वैद्य, ज्योती चन्ने, जितेश कायरकर, आरती रोडे, हे सर्व पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. अध्यक्ष पदाचा मान परत एकदा विदर्भाला मिळाला असल्याने तो आनंद साजरा करण्यासाठी वरोऱ्यातील विदर्भ साहित्य संघाच्या पदाधिकाऱ्यांनी डॉ. रविंद्र शोभणे यांची भेट घेवून त्यांचे अभिनंदन केले .

# प्रमोद नागापुरे यांच्या वाढदिवसा निमित्त 33 जणांनी केले रक्तदान

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

आनंद निकेतन महाविद्यालय कार्यरत असलेले कर्मचारी प्रमोद नागापुरे हे दरवर्षी आपल्या वाढदिवसानिमित्त महाविद्यालयात रक्तदान शिबिराचे आयोजन करीत असतात. यावर्षी त्यांच्या ४३ व्या वाढदिवसानिमित्त ३३ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

रक्तदान हे श्रेष्ठ दान आहे हा उपक्रम त्यांनी हाती घेऊन दरवर्षी वाढदिवसाला रक्तदान शिबिराचे आयोजन करण्याचे ठरविले आहे रक्त संकलना करिता जिल्हा वैद्यकीय महाविद्यालय, चंद्रपूर ची चमू आलेली होती. रक्त संकलन ची टीम मध्ये वैद्यकीय अधिकारी डॉ. देवकर,पंकज पवार समाजसेवा अधीक्षक, आनंद जिद्देवार रक्तपेढीत तंत्रज्ञ,विकी भगत रक्तपेढी तंत्रज्ञ व इतर सहकारी चमू सहभागी होते. रक्तदान शिबिराला भेट देण्याकरिता महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मृणाल काळे आले होते . या



रक्तदान शिबिरात विशेष रक्तदाते म्हणून ज्ञानेश्वर चाहारे गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती वरोरा, आणि संकेत सरपाते आर्मी सैनिक(माजी विद्यार्थी) यांनी विशेष रक्तदाते म्हणून उपस्थिती दर्शविली. प्रत्येक रक्तदात्याला एक टिफिन बॉक्स भेट स्वरूपात आयोजन समितीकडून देण्यात आला. रक्तदान शिबिरामध्ये खैरगाव मित्रपरिवार , आनंदवन मित्रपरिवार ,महाविद्यालयातील विद्यार्थी व महाविद्यालयातील माजी विद्यार्थी यांनी रक्तदान शिबिरात सहभाग घेतला होता. रक्तदान शिबिर यशस्वी करण्याकरिता प्राध्यापक तानाजी बायस्कर शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख, प्राध्यापक. संदीप पारखी एनसीसी अधिकारी, प्राध्यापिका. प्रियंका बुक्या, तुषार पारखी , कमलाकर डुकरे वरिष्ठ लिपिक, देवानंद अलोने मुख्य लिपिक, कमलाकर खेवले, मंगेश करंबे,प्रेमदास हेमने आनंदवन, . आकाश राऊत, शंकर पर्वत यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

## १५ ऑक्टोबर रोजी स्टेशन हेडक्वार्टर कामठीतर्फे सैनिक रॅलीचे आयोजन

चंद्रपूर : स्टेशन हेडक्वार्टर, कामठीतर्फे सुरेश भट्ट सभागृह, रेशीमबाग ग्राऊंड, नागपूर येथे रविवार, दि. १५ ऑक्टोंबर २०२३ रोजी सकाळी ९.३० वाजता सैनिक रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. या रॅलीमध्ये माजी सैनिक, माजी सैनिक विधवा यांच्याकरीता रेकॉर्ड ऑफिसतर्फे तक्रार केंद्र, ई.सी.एच.एस. स्टॉल, मेडिकल स्टॉल, सी.एस.डी व इतर स्टॉल लागणार आहेत. तरी, जिल्ह्यातील सर्व माजी सैनिक, माजी सैनिक विधवा व अवलंबित यांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहून सुविधांचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी कॅप्टन दीपक लिमसे यांनी केले आहे.

# संजय गांधी निराधार लाभार्थ्यांचे अनुदान त्वरित द्या अन्यथा आंदोलन- मिलिंद भोयर

**वरोरा । प्रतिनिधी**

तालुक्यातील संजय गांधी निराधार लाभार्थी यांचे मागील चार महिन्यापासून चे अनुदान लाभार्थी यांचे खात्यावर जमा झाले नसल्यामुळे लाभार्थ्यांना मोठ्या प्रमाणात आर्थिक अडचणीचा सामना करावा लागत आहे.

माहे जून २०२३ पासून संजय गांधी निराधार लाभार्थ्यांचे अनुदान शासनाकडून प्राप्त न झाल्यामुळे संजय गांधी लाभार्थी हे अनुदानापासून वंचित राहिले आहेत.संजय गांधी निराधार लाभार्थी ग्रामीण व शहरी भागातील गोरगरीब कुटुंबातील असल्यामुळे त्यांची उपजीविकेची समस्या निर्माण झाली आहे.

तरी संजय गांधी निराधार लाभार्थी यांचे अनुदान केंद्र व राज्य शासनाकडून वेळेवर प्राप्त झाल्यास गोरगरीब लाभार्थ्यांचा उपजीविकेचा प्रश्न मिटेल. मागील चार महिन्यापासून लाभार्थ्यांच्या खात्यात रक्कम जमा झाली



नसल्याने शासनाच्या चुकीचा धोरणामुळे गोरगरीब, अंध, अपंग, विधवा कुटुंबाची व लोकांची दिवाळी अंधारात जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. ही बाब लक्षात घेऊन वरोरा भद्रावती विधानसभेत क्षेत्राच्या आमदार प्रतिभा धानोरकर यांच्या मार्गदर्शनाखाली मिलिंद भोयर तालुका काँग्रेस कमिटी अध्यक्ष वरोरा तथा माजी अध्यक्ष संजय गांधी निराधार समिती वरोरा व राजेंद्र चिकटे माजी सभापती कृषी उत्पन्न बाजार समिती वरोरा यांचे नेतृत्वात वरोरा तहसीलदारामार्फत राज्याचे मुख्यमंत्री यांचे सचिव यांना निवेदन देण्यात आले आहे. तरी केंद्र व राज्य शासनाचे अनुदान दिवाळीपूर्वी प्राप्त न झाल्यास संजय गांधी लाभार्थी यांचे समवेत तहसील कार्यालयासमोर लाक्षणिक धरणे आंदोलन करण्याचा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. निवेदन देतेवेळी तालुका काँग्रेस कमिटी अध्यक्ष तथा माजी अध्यक्ष संजय गांधी निराधार योजना वरोरा मिलिंद भोयर, माजी सभापती कृषी उत्पन्न बाजार समिती वरोरा व विद्यमान संचालक राजेंद्र चिकटे, माजी सभापती पंचायत समिती वरोरा रवींद्र धोपटे व तालुक्यातील जवळपास ५० च्या वर निराधार लाभार्थ्यांची उपस्थिती होती.

## शब्द वेध

### माणूस

माणसाला माणूस म्हणण्याच्या
लायकीचा माणूस मफमुळी
राहिला नाही......
तंत्र ज्ञानामुळे झाली प्रगती जरी,
कधी जाळेल भस्मासूर अवनीला
विश्वास ही तो राहिला नाही !
म्हणेल पुढची पिढी माणसांना
दाखवा मज मूळ माणूस
अजूनही मी तो
पाहिला नाही...!!



सुभाष उसेवार
९०११२६२४३९

# नारायणराव काळे स्मृती मॉडेल कॉलेजमध्ये रक्तदान

**आर्वी । प्रतिनिधी**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर संलग्नित नारायणराव काळे स्मृती मॉडेल कॉलेज, कारंजा घाडगे येथील राष्ट्रीय सेवा योजना विभाग, रेड रिबन क्लब व आय.क्यु.ए.सी. च्या वतीने गांधी जयंती सप्ताहच्या निमित्याने रक्तदान, रक्तगट तपासणी, हिमोग्लबीन तपासणी व रक्तदाब तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात मोठ्या प्रमाणात विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

या शिबिरामध्ये १६४ विद्यार्थ्यांची रक्तदाब तपासणी करण्यात आली तर १०४ विद्यार्थ्यांचे रक्तगट व हिमोग्लबीन तपासणी करण्यात आली. त्यामधील पात्र एकूण ३० विद्यार्थी, माजी विद्यार्थी, शिक्षक व गावातील नागरिकांनी रक्तदान केले. यादरम्यान रेनबो रक्त व रक्तघटक संकलन केंद्र, नागपुर या रक्तपेढीने रक्त संकलनाचे कार्य केले. त्यांचे प्रमुख डॉ. भांगे यांनी विद्यार्थ्यांना रक्तदानाबद्दल भेट स्वरूपात वस्तू दिल्या व राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारे विद्यार्थ्यांना अल्पोपहार देण्यात आला. डॉ.



रवींद्र सोनटक्के व राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. गौतम वाकडे यांनी विद्यार्थ्यांना रक्तदानाचे महत्त्व समजावून सांगितले. शिबिराचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय धनवटे यांनी केले. यावेळी कला शाखेचे समन्वयक डॉ. गणेश मोहोड, वाणिज्य शाखेचे समन्वयक डॉ. रवींद्र सोनटक्के, विज्ञान शाखेचे समन्वयक डॉ. विजय राघोर्ते उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन व आभारप्रदर्शन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. पुष्पांजली बिडवई यांनी केले. शिबिराला महाविद्यालयातील समस्त शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# शिवसेना( उद्धव बाळासाहेब ठाकरे ) पक्षातर्फे फौंजी वारीयर्स टीमचा सत्कार

## जिल्हाप्रमुख मुकेश जिवतोडे यांनी केले अभिनंदन

**वरोरा । प्रतिनिधी**

अमरावती येथील डा. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयात अमरावती जिल्हा आष्टेडु आखाडा असोसिएशन व डा बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय उत्तम नगर अमरावतीच्या संयुक्त विद्यमाने १८ व्या राज्यस्तरीय आष्टेडु आखाडा स्पर्धा २०२३ चे दिनांक ३० सप्टेबर ते २ आक्टोबरला आयोजन करण्यात आले होते . या स्पर्धेत वरोरा यांच्या फौजी वारिअर्सच्या विद्यार्थ्यांनी नेत्रदिपक यश संपादन केलेले आहे. यानिमित्त शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख मुकेश जिवतोडे यांनी यश संपादन केलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे शिवसेना जिल्हा कार्यालय वरोरा येथे अभिनंदन केले व त्यांना मार्गदर्शन करणारे गुरू रवी चरूरकर यांचा शाल तसेच छत्रपती



शिवाजी महाराज यांची प्रतिमा देऊन सत्कार केला.याप्रसंगी रितिक धवणे, शंतनू धवणे, सानिया आवारी, पियुष विधाते, वेदिका भोयर, सोनू निखाडे, फकिरा निखाडे, पदमश्री झुरळे, सोनू दसूडे, वेदांत अतकळे या विद्यार्थांना त्यांच्या उज्वल आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी युवासेना जिल्हा प्रमुख मनिष जेठानी, माजी सैनिक प्रवीण चिमूरकर, कृषि उत्पन्न बाजार समितीचे माजी संचालक राजू आसुटकर, शिवसेना विधानसभा मीडिया प्रमुख गणेश चिडे, युवती सेना तालुका प्रमुख तेजस्विनी हनुवते, युवती सैनिक दिव्या चौधरी,समस्त शिवसैनिक, युवासैनिक उपस्थित होते.

# सरकारी शाळा अन् शेतकऱ्याची किडनी

**राज्य शासनाने जवळजवळ ६५ हजार सरकारी शाळा खाजगी संस्थाना दत्तक देण्याचा निर्णय घेतला. हा निर्णय म्हणजे गोरगरिबांचे हक्काचे शिक्षण हिरावून घेणारा निर्णय आहे अशी भावना सर्वत्र निर्माण झाली आहे. या निर्णयाची अंमलबजावणी झाली तर गरीब हक्काच्या शिक्षणापासून वंचित होतील असे वाटते. शासनाच्या या निर्णयाला विरोध करत सरकारी शाळा जैसे थे सुरू राहाव्यात यासाठी यवतमाळ जिल्ह्यातील शेतकरी विजय शंकर ढाले यांनी स्वत:ची किडनी विकण्याची तयारी दर्शविली आहे. परिस्थितीचे जे गांभीर्य या शेतकऱ्याला कळले ते इतरांना का कळू नये?**




दोन दिवसांपूर्वी एका दैनिकामध्ये बातमी छापून आली. बातमीचे शिर्षक आहे. साहेब शाळा विकू नका, मी शासनाला किडनी देतो २० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळांच्या संदर्भात राज्य शासनाने ६५ हजार सरकारी शाळा समाजातील धनदांडग्यांना दत्तक देण्याचा निर्णय घेतला आहे. शासनाच्या या निर्णयामुळे व्यथित झालेल्या यवतमाळ जिल्ह्यातील शेतकरी विजय शंकर ढाले यांनी प्रशासनाच्या निर्णयावर संताप व्यक्त करत आपल्या कडक भावना व्यक्त करताना स्वत:ची किडनी विकून शाळांचा खर्च भागविण्याची तयारी दर्शवली आहे. जर एका किडणीने काम भागत नसेल तर दुसरीही किडनी विकण्याची त्यांनी तयारी दर्शवली आहे. सदर आशयाचे निवेदन त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर केल्याने महाराष्ट्रात एकच खळबळ उडाली आहे. गरिबांसाठी शाळा वाचल्या पाहिजेत ही भूमिका घेऊन या शेतकरी बांधवांने घेतलेली हा निर्णय समाजातील सुशिक्षितांच्या डोळ्यात अंजन घालणारा आहे. सुशिक्षितांना समाजामध्ये वावरताना शासनाच्या चुकीच्या पद्धतीने वागण्याचेही काहीच वाटत नाही. लोककल्याणकारी निर्णयांच्या आडोशाने सरकार सर्वसामान्य गरीबांना शैक्षणिक क्षेत्रात वाऱ्यावर सोडणार आहे. ही गोष्ट या अल्पशिक्षित शेतकऱ्याला कळली ती उच्चशिक्षित समजल्या जाणाऱ्यांना कळू नये याचे नवल वाटते. खरे म्हणजे शासनाच्या या निर्णयाची आपल्याला लाज वाटली पाहिजे असा निर्णय सरकार घेत आहे. पुरोगामी महाराष्ट्रात घेतलेला हा निर्णय शरमेने मान खाली घालायला लावणारा निर्णय आहे. शाळा हस्तांतरित करण्याच्या या निर्णयाचे समाजातील नागरी, सुशिक्षित लोकांना गांभीर्य वाटले नाही. ते खेडेगावातील एका सर्वसामान्य शेतकऱ्याला वाटले. त्याने आपला कृतीतून विरोध व्यक्त केला.स्वत:ची किडणी विकायची तयारी दर्शवून शासनाचे डोके ठिकाणावर आणण्याचा प्रयत्न केला आहे. सर्वसामान्य गरीब घरातील मुलांना शिक्षण घेण्यासाठी हक्काचे स्थान म्हणजे शासकीय शाळांचा मोठा आधार होता. परंतु प्रत्येक ठिकाणी नफा शोधणाऱ्या राज्य शासनाने आपल्या दिवाळखोर बुद्धीचे प्रदर्शन केले. सरकारी शाळा समाजातील धनदांडग्यांना दत्तक देऊन स्वत:चे दायित्व नाकारत पळपुटेपणा स्विकारला. या निर्णयामुळे सर्वसामान्य नागरिकांच्या व्यथा आणि वेदना जाग्या झाल्या. शासनाचा हा निर्णय कुणालाही आवडलेला दिसत नाही. पण शासनाच्या निर्णयाला विरोध करणार कोण? जिल्हा परिषदेच्या शाळा म्हणजे खेड्यापाड्यातील दुर्गम भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय होती. आता या शाळाच जर दत्तक दिल्या तर गरीबांचा मोफत शिक्षणाचा हक्क डावलला जाणार आहे. सुरूवातीला काही वर्षातच शासनाचा उदास हेतू समोर येईल . शासनाने चुकीचा निर्णय घेतला आहे हे आपोआप सिद्ध होईल.कारण कुठलेही खाजगीकरण हे लोकांच्या उपयोगाचे नसते. त्यात धनदांडग्यांचाच लाभ असतो. शासनाने घेतलेला हा निर्णय म्हणजे घरात मच्छर झाले म्हणून घर जाळून टाकल्यासारखे आहे. शासनाच्या या निर्णयाने व्यथित झालेल्या या शेतकऱ्यांने आपल्या साध्या सोप्या शैलीत



शासनाला विनंती केली आहे. त्याला वाटले असेल की, शाळा चालविण्यासाठी सरकारकडे पैसे नसेल. निदान आपण आपल्या किडन्या विकून शासनाची पैशाची गरज भागवावी. या बातमीने सर्वत्र खळबळ माजली. समाजमाध्यमांवर मतमतांतरे व्यक्त झाली. सर्वांनाच लाज वाटायला पाहिजे असा हा शासनाचा निर्णय आहे. एकदा या शाळा श्रीमंतांच्या घशात गेल्या की या शाळेतील फी सर्वसामान्य गरीब लोकांना परवडण्यासारखी राहणार नाही. परिणामतः गरिबांची मुले शिक्षण घेऊ शकणार नाही. प्रत्यक्षाप्रत्यक्ष ती शिक्षणापासून वंचित राहील. लोककल्याणकारी लोकशाहीत सर्वांना हक्काचे शिक्षण उपलब्ध करून देणे हे शासनाचे कर्तव्य होते आणि आहे. शासनाच्या शिक्षण मंत्रालयाने यासाठी पुढाकार घेऊन सर्वांना शिक्षणाचा हक्क मिळवून द्यायला पाहिजे. शासनाच्या सर्वच योजनातून शासनाला नफा मिळालाच पाहिजे असे गृहीत धरणे चुकीचे आहे.हे काही लोककल्याणकारी शासनाचे लक्षण नव्हे. अनेकदा लोककल्याणकारी योजनांमध्ये शासनाला फायदा होईल, नफा मिळेलच असे सांगता येत नाही. तरीही लोकहित लक्षात घेता नुकसानीत या योजना चालवल्या पाहिजे. आर्थिक नफा नुकसान या गोष्टींना महत्त्व देण्यापेक्षा लोककल्याणाला महत्त्व देणे अपेक्षित असते. केवळ शैक्षणिक खर्च वाचविण्यासाठी शासन शाळा विकण्यासारखे असले फालतू उद्योग करणार असेल तर शासनाच्या बुद्धिमत्तेची किव करावीशी वाटते.

शिक्षणाचे जे महत्त्व या शेतकऱ्याला कळले ते समाजातील उच्च शिक्षकांना कळू नये यापेक्षा आणखी वाईट परिस्थिती काय असू शकते.

खेड्यापाड्यातील सरकारी शाळा नुकसानीमध्ये आहे हे खरे आहे. परंतु त्यासाठी काही शासकीय धोरणेही कारणीभूत आहेत याचा विचार केला पाहिजे. या शासकीय शाळांना बदनाम करण्यामध्ये प्रत्यक्षाप्रत्यक्ष प्रशासनाचाच हात आहे. राजकीय पॉलिसी शाळांना बदनाम करण्याची आहे. जिल्हा परिषदेच्या शाळा शिक्षकांचा विचार केला तर या शिक्षकांना शिकविण्यापेक्षा अशैक्षणिक कामांच्या जबाबदाऱ्या अधिक मोठ्या प्रमाणामध्ये असतात. माणसांपासून तर जनावरे मोजण्याची जबाबदारीसह आणखी नको नको ती कामे त्यांच्याकडून करवून घेतली जातात. परिणामतः जिल्हा परिषद शिक्षक हे शाळेत शिकविण्यापेक्षा प्रशासनाने त्यांच्यावर सोपविलेल्या अन्य उपक्रमातच व्यस्त असल्याने त्यांना वर्गात शिकवायला वेळच मिळत नाही. परिणामतः ग्रामीण भागातील हे विद्यार्थी अभ्यासात मागे पडतात. त्यांना अभ्यासक्रम काहीच येत नाही असे कारण सांगून सरकार या शाळा शिक्षकांकडे बोट दाखवून बदनाम करतात. या शाळा खाजगी संस्थांना दत्तक देण्यासाठी शासनाचा हा डाव आहे हे लक्षात घेतले पाहिजे. हा निर्णय म्हणजे विनाशकाले विपरीत बुद्धी असा निर्णय आहे. यवतमाळ जिल्ह्यातील या शेतकऱ्याने भोळेपणाने शासनाला विरोध करीत शासनाच्या निर्णयाला विरोध करीत साहेब शाळा विकू नका. जर तो खर्च परवडत नसेल तर मी एक किडनी विकायला तयार आहे. एक किडनी विकून भागत नसेल तर दुसरीही किडनी विकायला तयार आहे. परंतु शाळांचे हस्तांतरण थांबायला पाहिजे अशी भावना व्यक्त केली. जी गोष्ट या सर्वसामान्य शेतकरी बांधवाला कळली ती आपल्यासारख्या शहरी लोकांना कळू नये यापेक्षा लाजिरवाणी गोष्ट काय असू शकते.

# २० पेक्षा कमी पटसंख्येच्या प्राथ.शाळा बंद केल्यास मानवीय धोके ? मंथन एक, प्रश्न अनेक

छोट्या गांव,वस्ती,पाड्यातील २० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळा बंद करण्याच्या शासकीय धोरण राबविण्याविषयक धोरणामुळे अनेक दुरगामी भविष्यकालीन अदृश्य आव्हाणांना सामोरे जावे लागेल जी आव्हाने सामाजीक अस्थिरतेची नांदी तर ठरणार नाही ना? असा प्रश्न उभा ठाकण्याची भिती आज उभी होत आहेत, त्याचा परिणाम ग्रामीण समाजजीवनावर दिसेल. या धोरणाचे अंमलबजावणीतून अशा हजारो खेड्यापाड्यातील समाजातील असंख्य घटकांची शैक्षणिक,सामाजीक व राजकीय मुल्यांची घसरण होणार ?


समाज जीवनात मानवाने मानवी उत्पत्तीपासून आपल्या बुद्धीचातुर्याने स्वतःला अनेक टप्प्यातून प्रवास करत जात वर्तमान स्थितीपर्यंत आपले जीवनमान विकसित केले. पुढे गरजेनुसार तो अनेक बाबतीत तो स्वतःला विकसित करतीलही.यासाठी भुतकाळात त्याने निसर्गातील घडणाऱ्या दैनंदिन घडामोडीबरोबरच प्राप्त परिस्थिती व सामाजीक वातावरणातून जे ज्ञान मिळविले,स्वतःमध्ये जे सामाजीक मुल्ये विकसित केले ते अप्रत्यक्ष मिळणाऱ्या शिक्षणातूनच.म्हणजे मानवी जीवनाला व समाज व्यवस्थेला योग्य घडीवर ठेवण्यात शिक्षण हे अतिशय महत्वाचे ठरते. या मताला नाकारण्याची प्रवृत्ती अंगी बाणण्याची हिम्मत कोणीही करणार नाही...!

मग शिक्षणाचं महत्व किती व ते प्रत्तेकाच्या जीवनात कसे व किती महत्वाचे आहे. याची आज जरी समाजाला ओळख झाली असली तरी हे सत्य सांगण्यासाठी इतिहासाची पाने रंगली हे महत्वाचे आहेत.म्हणुन आपल्या भारतीय इतिहासात सर्वसामान्यांच्या शिक्षणासाठी,उत्थानासाठी झालेला थोरांचा शैक्षणिक संघर्ष नजरेआड करता येणार नाही.

विद्येविना मती गेली,
मतीविना निती गेली,
नितीविना गती गेली,
गतीविना वित्त गेले,
आणि शेवटी वित्ताविना सामान्य समाज खचला.

हे ज्योतिबांच्या शैक्षणिक हक्क मिळवून देणा-या लढ्यातील विचार आजच्या व्यवस्थेला खुप काही सांगून जाते.भारतीय शैक्षणिक चळवळीच्या इतिहासाकडे डोकावून पाहिल्यास लोकराजे,छ.शाहू महाराज,स्वामी दयानंद सरस्वती,राजा राममोहन रॉय,स्वामी विवेकानंद,संत गाडगे बाबा,राष्ट्रसंत तुकडोजी महाराज ह्या बरोबरच अनेक साहित्तिक,सुधारक या थोरवीर समाज सुधारक व संतांनी समाजाची जडणघडण शिक्षणातून होते हे समाजाला सामजविण्यासाठी जागृत केले.त्यांनी त्यासाठी केलेला संघर्ष आपल्या आजच्या शैक्षणिक






व राजकीय व्यवस्थेने समुजून व स्मरून घेतला पाहीजे.

गाव,पाडा,वस्ती जीथं, तीथं शाळा,६ ते १४ वयोगटातील सर्व बालक शिकले पाहिजे,ते टिकले पाहीजे,त्यांना मोफत शिक्षण मिळावे यासाठी महात्मा ज्योतिबा फुल्यांनी हंटर कमिशनसमोर साक्ष दिली.पुढे बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षण हे बहुजनांच्या उद्धाराचे खरे शस्त्र आहेअसे सांगुन संविधानाच्या मार्गदर्शक तत्वांमध्ये ६ ते१४ वयोगटातील मुलामुलींना सक्तीचे व मोफत शिक्षण मिळावे यासाठी उपाययोजना केली,त्याआधी लोकराजे छ.शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात दीन-दलित, शेतकरी शेतमजूर, आश्रित-निराश्रीत कुटूंबातील तसेच समाजातील सर्व मुलांमुलीसाठी शिक्षणाच्या सोई उभ्या केल्या.देशाचे अदृश्य असं उत्पादन म्हणजे शिक्षण होय, ज्यावर राष्ट्राची भविष्यकालीन उभारणीचं शिल्प साकारता येते.हे समजून घेणं तेवढंच महत्वाचं आहे



पंडीत लोंढे शिक्षक
चंदनखेडा,ता.भद्रावती,जि.चंद्रपूर
भ्र.ध्व.क्र.९९२१३९९७०७

स्वतंत्र भारतात शिक्षणाची दृष्टी

भारत स्वतंत्र होऊन ७५ वर्ष उलटली.देश अमृतमहोत्सव साजरा करुन पुढे जाताहेत.अशा परिस्थितीत गावागावात,वस्त्या-पाड्यात शिक्षणाच्या सुविधा आजवर निर्माण झाल्या,त्यासाठी अनेक स्थित्यंतरे घडली.संविधानातील कलम २१ चा संदर्भाने भारतीय स्वातंत्र्यानंतर शैक्षणिक बदलाचे वारे वाहू लागले. खडू-फळा मोहिमेअंतर्गत एकशिक्षकी शाळांचे रुपांतर दोन शिक्षकी शाळेत झाले.सर्व शिक्षा अभियानात वाड्या वस्त्यावरिल,तांड्यावरिल मुले मुली यांना प्राथमिक शिक्षण मिळाले पाहिजे यासाठी त्यांचे दारापर्यंत शिक्षण दिले गेले पाहिजे असे प्रयत्न झाले.म्हणून वस्तीशाळा सुरू झाल्या.पर्यायाने सर्व दीनदलीत,दुःखी कष्टी,मोल मजुरी करणा-यां पालकांच्या पाल्यांची शिक्षणाची सोय त्याच्या वस्तीत झाली.हंगामी कामगारांची मुले शिक्षणापासून वंचित राहू नये म्हणून पर्यायी शिक्षण व्यवस्था उभी झाली व ती राबविली गेली,प्रत्येक बालकाचा शोध घेऊन त्याला शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यास एक चळवळ उभी झाली,विशेष म्हणजे समाजातील दुर्लक्षीत दिव्यांगासाठी विषेश शिक्षणाची व्यवस्था करण्यात आली.शेवटी ऊद्देश एकच प्रत्येक बालक शिकला पाहिजेत,त्यासाठी प्रत्येकाच्या दारापर्यंत शिक्षण.

शासनाचे वर्तमान शैक्षणिक धोरण

मग एवढे असतांना आर.टी.ई. अधिनियम २००९ अन्वये शाळांना ह्या सा-या पटसंख्येच्या अटी घालून लहान पटसंख्येच्या म्हणचे कमाल २० पटसंख्येच्या खाली पटसंख्या असलेल्या शाळा बंद करण्याचे धोरण अवलंबिले. त्यात अधिनियमाची अंमलबजावणी आणि शासनाला आर्थिक कटोतीच्या मापात ठेऊन फायद्यात हा नियम फक्त आर्थिकतेच्या चौकटीत अंमलबजावणी करतांना बसविला. मग हे सर्व करून काय साध्य करणार..? ते करतांना होणारे दुरगामी परिणाम लक्षात घेतले जात आहे काय ? ह्यावर नक्की शंका आहे.पण त्यामुळे होणारे संभाव्य धोके,अपेक्षित मुल्य संवर्धन करणा-या शाळा शिक्षणातून खुप काही सांगून जाते.मग शैक्षणिक कार्य करणा-या परिस्थीतीचं व गावातील शाळा या मुल्यविषयक संवर्धन केंद्राच्या नष्टतेतून काय होणार ?

मग ह्या कमी पटसंख्येच्या शाळा बंद केल्याने होणारे दृष्परिणाम भविष्यातील मोठी आव्हाणे उभी करतील,राष्ट्र उभारणीत अडसर निर्माण करतील काय ? याचे उत्तर नक्कीच येणारी परिस्थितीच सांगून जातील.

धोकादायक परिणाम नक्कीच होऊ शकतो !!!

संभाव्य मानवी धोके...

ह्या छोट्या गावातील,वाडी,वस्तीतील मुले शिक्षणापासून वंचित राहण्याचा धोका होणार..? सामाजिक मुल्यांचे सुसंस्कार यापासून बालअवस्था दुर जाईल.

शासन त्या शाळातील बालकांना इतरत्र शिक्षणाची सोय करून देतील,पण पालक खरंच पाल्याच्या अशा शैक्षणिक व्यवस्थेशी समाधानी असेल ?

गळतीचे शेकडोंचे प्रमाण वाढेल ? अवैधाणिक कृत्यांवर उपचारासाठी संस्कारकेंद्रे संपतील.

गाव,खेड्यातील शैक्षणिक,मुल्यवर्धक,राष्ट्रीय मुल्ये,संपतील काय ??

राष्ट्रीय सण समारंभ याबाबात गावपातळीवर आजतागायत आबाधीत असलेली राष्ट्रीयत्वाची छाप कायमची मिटून जाईल.कारण हे उत्सव गावासाठी इतिहासजमा होईल.

गाव-पाड्यातील व गावातील शैक्षणिक वातावरण संपेल?

शासकीय योजना शाळेअभावी गावकरी अनभिज्ञ राहिल?

असे एक ना अनेक प्रश्न यानिमित्ताने उभे होतील. त्या गावात,वाड्या वस्त्या,पाड्यामध्ये निर्माण होणारे संस्कारीत मुल्यांची खाण नष्ट केल्याने सामाजीक अधःपतन होईल ? नक्की होईल अशी भिती व्यक्त व्हायला शंका आहे.म्हणून शासन प्रशासनाने अशा छोट्या गावातील शाळा पटसंख्येच्या अटीवर बंद करू नयेत.त्यावर आर . टी .ई क्ट च्या कलमाच्या सुधारणेवर विचार करावा.व समाजावर जे गंभीर परिणाम होतील त्यापासून समाजाला दुर राहण्याच्या स्थितीचे दुराचारी होण्याचे कारस्थानी म्हणून भविष्यातील भारतीय समाजाला बोट दाखविण्याची वेळ न यावी यासाठी याची काळजी घेतली जावी,ही समाजाची आर्त हाक नव्हे तर भविष्यातील ग्रामीण मुल्यवर्धकता,जी आजवर शाळांच्या माध्यमातून जपली गेली आहे तिचे संवर्धन नक्कीच कायम राहिले पाहिजेत व ते राखता येईल.म्हणून सर्व स्तरासाठी,सर्वांगिण मोफत शिक्षण,या स्वतंत्र भारतातील संवैधाणिक शैक्षणिक उद्देशाला सर्वांना जपता यावे यासाठी प्रयत्न व्हावे,नव्हे तर ते साध्य करून सर्वार्थाने राष्ट्रनिर्मितीस सर्व स्तरातून उचित उद्देश सफल करता येईल यात शंका राहणार नाही.शेवटी,असे सहज वाटावे की,वंचित घटकांना सर्वाथाने सर्वांगिण शिक्षण मिळाले पाहिजे.जे की २० किंवा त्यापेक्षा कमी पटसंख्या असलेल्या गावातील शाळा बंद करू पाहणा-या व्यवस्थेने यावर विचार करावा व भविष्यातील होणारे मानवीय नुकसान टाळता यावे.सर्व स्तरीय शिक्षण व्यवस्थेतून एकसंध निस्पृह समाज व सशक्त राष्ट्र घडविण्यात सातत्य ठेवता येईल,पर्यायाने प्रत्येक वाडी-वस्ती व गावातून मुल्यवर्धक असे राष्ट्रीय,शैक्षणिक व सामाजिक मुल्ये जपता येईल. सर्वार्थाने सर्वांगिण सर्वस्तरीय शिक्षण हाच प्रत्येक स्तरातील बालकाचा हक्क.....!!!

# भाजपने महाराष्ट्रातील चार नेत्यावर खुप अन्याय केला आहे-खासदार सुप्रिया सुळे



**कुर्डू (सोलापूर)** –शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे, राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार साहेब, केंद्रीय परिवहन मंत्री नितीन गडकरी, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस या महाराष्ट्रातील चार नेत्यावर भारतीय जनता पार्टीच्या अदृश्य शक्ती अर्थात अमित शहा यांनी खूप अन्याय केल्यामुळेच ते अडचणीत आले आहेत. आणि या चौघांच्या विरोधात बोलले की मला खुप राग येतो, असे मत खासदार सुप्रिया सुळे यांनी या कार्यक्रमात व्यक्त केले.कुर्डू, ता. माढा, जिल्हा सोलापूर येथील मंगल कार्यालय आयोजित करण्यात आलेल्या माढा लोकसभा मतदारसंघाच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्ता मेळाव्यात त्या बोलत होत्या.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार विनायकराव पाटील होते. यावेळी व्यासपीठावर रोहिणी खडसे, अभिजित पाटील, संजय पाटील घाटणेकर, बळीराम साठे, अभिजीत पाटील, बाळासाहेब पाटील, औदुंबर देशमुख, आशा टोणपे, दत्ताजी गवळी, अनुराधा गवळी, राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.सुळे पुढे बोलताना म्हणाल्या की, महाराष्ट्राचे महत्त्व कमी करुन गुजरातचे महत्व वाढवण्यासाठी भाजपची अदृश्य शक्ती सर्वतोपरी प्रयत्न करत आहे. बाळासाहेब ठाकरे व शरद पवार यांनी जन्माला घातलेलं पक्ष यांनी खोक्यांची व पदांची आमिश दाखवून फोडले. फडणविस यांनी १०५ जागा आणुन ही त्यांना उपमुख्यमंत्री केले व गडकरी यांचे केंद्रातील अधिकार कमी केल्याने यांच्या वरच फार मोठा अन्याय केल्याचे सांगितले.मी जर संसदेत सरकार विरोधात बोलले की, लगेचच घरी इन्कम टॅक्सची नोटीस घरी येते. व नवऱ्याचा मेसेज येतो लव लेटर आले. तुम्ही सरकार विरोधात बोलला की आईस लागला म्हणून समजाच. 'आईस'चा अर्थ 'इन्कम टॅक्स'ची नोटीस, सीबीआय चे झंझट आणि ईडीची कारवाई होतेच. मी त्याचे जीवंत उदाहरण असल्याचे सांगितले. महाराष्ट्रातील ट्रीपल इंजिन खोके सरकार कॉंट्रॅक्ट बेसिसवर अधिका-याच्या नेमणूका करतय म्हणजेच त्यांना आरक्षणाचा रस्ता बंद करायचा आहे. हा संविधानाचा अपमान आहे. शाळा बंद करून दारची दुकाने वाढवत आहात अशा या सरकारचा २०२४ च्या निवडणुकीत करेक्ट कार्यक्रम करण्याचा निर्धार करा असे आवाहन त्यांनी केले.पवार साहेबांबाबत काही उलट सुलट बोललात तर तीन वेळा ऐकून घेईन, चौथ्या वेळेस असा करारा जवाब देईन, तुमचे मतदार सघात फिरणे मुश्किल होईल. असा सज्जड दम ही नामोल्लेख टाळून दिला.सर्वे सरकारच्या विरोधात येत असल्याने कोणत्याही निवडणुका घेण्याचे धाडस या सरकार मध्ये नसल्याने आता एक वर्षानंतरच निवडणुका होतील असा अंदाज सुळे यांनी व्यक्त केला.यावेळी बोलताना रोहिणी खडसे म्हणाल्या, सध्या राज्यात दुष्काळाची छाया आहे, सरसकट राज्यात दुष्काळ जाहीर करण्याची मागणी करून राजकारणात जे दिसतेय त्या पेक्षा वेगळी परिस्थिती आहे. विनाकारण धास्ती घेऊ नका. सगळे जण पराभव करण्याच्या तयारीत आहेत ही संधी आपण गमवायची नाही, जोमाने तयारीला लागा असा आदेश त्यांनी कार्यकर्त्यांना दिला.राष्ट्रवादी काँग्रेसचे संजय पाटील घाटणेकर हे माढा लोकसभा मतदारसंघातुन शरद पवार यांना जेवढं मताधिक्य दिले होते तेवढेच मताधिक्य इंडिया आघाडी च्या उमेदवाराला दिल्या शिवाय शांत बसणार नाही.असे सांगितले.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक संजय पाटील घाटणेकर यांनी केले. यावेळी कविता म्हेत्रे, बाळासाहेब पाटील, औदुंबर देशमुख, संतोष वारे व अभिजीत पाटील यांची भाषणे झाली. सुत्रसंचालन सुधीर क्षीरसागर यांनी तर आभार दत्ताजी गवळी यांनी मानले.राष्ट्रवादी पक्षाच्या निवडणूक आयोगा पुढील सुनावणी बद्दल बोलताना म्हणाल्या की प्रेमाने मागितले असते तर दिले असते पण तुम्ही वडिलांचा पक्ष हिसकावून न्यायला लागला तर कदापिही मिळणार नाही. तुम्ही बायकांच्या नादी लागू नका एकदा का लाटणे या खोके सरकारच्या मागे लागले तर तुम्ही नेस्तनाबूत होताल. असे सांगून ८३ वर्षाच्या पवार साहेबांनी या पक्षाला जन्म दिलाय त्याविरूद्ध लढताना पवार साहेब स्वतः बाजू मांडायला गेले होते. त्यांचा फक्त वकील आला होता. त्या वकीलाचाही करेक्ट कार्यक्रम केला नाही तर सुप्रिया सुळे नाव सांगणार नाही असे त्या म्हणाल्या.

## सोलापूरकरांकडे निघाल्या २०००च्या १४ लाख नोटा! ७ ऑक्टोबरपर्यंत जिल्ह्यातील बँकांमध्ये २८०.८० कोटी रुपये जमा



**सोलापूर**–व्यवहारातून दोन हजारांची नोट कायमची बंद झाली आहे. पूर्वीही व्यवहारात न दिसणारी दोन हजाराची नोंद बंद करण्याचा निर्णय झाल्यानंतर ७ ऑक्टोबरपर्यंत जिल्ह्यातील बँक ऑफ इंडिया व स्टेट बँकेच्या ट्रेझरी शाखेत तब्बल १४ लाख तीन हजार (२८०.७० कोटी रुपये) नोटा जमा झाल्या आहेत.नोटाबंदीनंतर दोन हजाराची नोट चलनात आली, पण काही महिन्यांनी ही नोट व्यवहारातून गायबच झाली, अशी स्थिती होती. या पार्श्वभूमीवर 'आरबीआय'ने व्यवहारातील दोन हजारांची नोट बंद करण्याचा निर्णय घेतला. पण, बँकेच्या ग्राहकांकडील नोटा जमा करण्यासाठी ३० नोव्हेंबरपर्यंत मुदत देण्यात आली होती.मुदतीनंतरही कोणाकडे नोटा राहिल्या असल्यास त्यांना पुन्हा सात दिवसांची वाढीव (७ ऑक्टोबरपर्यंत) मुदत देण्यात आली होती. दरम्यान, ३० सप्टेंबरपर्यंत सोलापूरच्या बँक ऑफ इंडिया व स्टेट बँकेच्या ट्रेझरी शाखेत २७९ कोटी ९४ लाख रुपयांच्या नोटा जमा झाल्या होत्या. मुदतवाढीनंतर बँक ऑफ इंडियाच्या ट्रेझरी शाखेत ३० लाखांच्या नोटा जमा झाल्या असून स्टेट बँकेतही काही नोटा जमा झाल्या आहेत. आता दोन हजाराची नोट चलनातून म्हणजेच व्यवहारात चालणार नाही. तसेच जिल्ह्यातील कोणत्याही बँकेत दोन हजाराची नोट स्वीकारली जाणार नाही. 'आरबीआय'ने दिलेली सात दिवसांची मुदत आता संपुष्टात आली आहे.३० सप्टेंबरच्या मुदतीत जिल्ह्यातील नागरिकांनी त्यांच्याकडील तब्बल १४ लाख तीन हजार नोटा बँकांमध्ये जमा केल्या. पण, काही जणांकडे अजूनही नोटा शिल्लक असतील हे गृहीत धरून पुन्हा सात दिवसांची मुदत देण्यात आली. या काळात बँक ऑफ इंडियात ३० लाख तर अन्य बँकांमध्ये अंदाजे १० लाखांच्या नोटा जमा झाल्या आहेत. आता नोटा जमा करण्यासाठी 'आरबीआय'च्या मुंबई किंवा नागपूर येथील (एका व्यक्तीला एका दिवसात केवळ दहा नोटा) शाखेतच जमा कराव्या लागणार आहेत.

## सोलापुरातील १४ गावे व १२७ वाड्या तहानलेल्याच! उजनी ६० टक्के; कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत १५ जूनपर्यंतचे ठरणार नियोजन



**सोलापूर :** पावसाचा परतीचा प्रवास सुरू झाला, तरीदेखील राज्यातील धरणातील पाणीसाठा ६० टक्क्यांवर गेलेला नाही. दुसरीकडे पावसाळा अजून संपलेला नसतानाही राज्यातील ३१४ गावांसह ९९२ वाड्या-वस्त्यांवर पाण्यासाठी टँकर सुरू आहेत. त्यात सोलापूर जिल्ह्यातील १४ गावे व १२७ वाड्यांवर टँकरने पाणी पुरविले जात आहे.

पुणे जिल्ह्यातील भीमा खोऱ्यातील पिंपळगाव जोगे, माणिकडोह, येडगाव, विसापूर, चिल्हेवाडी, कासारसाई, मुळशी, टेमघर, खडकवासला, गुंजवणी, वीर व उजनी ही धरणे अजूनही पूर्ण क्षमतेने भरलेली नाहीत. पुणे, नगर व सोलापूर जिल्ह्याचा आधार असलेले उजनी धरण अद्याप ६० टक्क्यांवरच आहे. यंदा अपेक्षित पाऊस झाला नसल्याने खरीप हंगामात पाणी सोडता आलेले नाही.१५ ऑक्टोबर २०२३ ते १५ जून २०२४ या आठ महिन्यांचे काटेकोर नियोजन करावे लागणार आहे. शेतीला एक-दोन आवर्तने सोडली जातील, पण पहिले प्राधान्य पिण्यासाठीच असणार आहे. १५ ऑक्टोबरपर्यंतचा पाणीसाठा अंतिम मानून कालवा सल्लागार समितीच्या माध्यमातून धरणातील उपलब्ध पाण्याचे काटेकोर नियोजन केले जाणार आहे. शेतीला साधारणतः डिसेंबर-जानेवारीत एक आवर्तन सोडले जाते, पण यंदा हे पाणी फेब्रुवारीअखेरीस सोडले जावू शकते. दुसरीकडे मार्च-एप्रिलमधील आवर्तन मे महिन्यात सोडले जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे पावसाळा अजून संपलेला नसतानाही शेतकऱ्यांचीही चिंता वाढल्याची सद्य:स्थिती आहे

## चिमुकल्यांचा जीव टांगणीलाच! सर्वोपचार रुग्णालयातील 'आयसीयू' हाउसफुल्ल

### शहर-ग्रमीणमधील शासकीय रुग्णालयात नाहीत 'आयसीयू' बेड

**सोलापूर :** येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालयातील (सरकारी रुग्णालय) खाटांची संख्या ५५० आहे, तरीपण ७६३पर्यंत क्षमता वाढविली आहे. तरीसुद्धा सध्या हॉस्पिटलमध्ये एक हजार ६० रुग्ण उपचार घेत आहेत. दुसरीकडे रुग्णालयातील 'आयसीयू' विभागही हाउसफुल्ल झाला आहे. 'आयसीयू'ची गरज असलेला रुग्ण दाखल होण्यासाठी आल्यास त्याच्यावर उपचार करायचे कसे? असा प्रश्न रुग्णालय प्रशासनासमोर निर्माण झाला आहे. शासकीय दवाखान्यात 'आयसीयू'ची सोय नाही. दुसरीकडे सर्वोपचार रुग्णालयाशिवाय सोलापूर शहर-जिल्ह्यातील कोणत्याच सरकारी दवाखान्यात नवजात बालकांच्या उपचारासाठी काचेची (वार्मर) पेटी उपलब्ध नाही. त्यातून सर्वोपचार रुग्णालयात बाळ आणेपर्यंत माता-पित्यांचा जीव टांगणीलाच असतो.सोलापूर जिल्ह्यात तीन उपजिल्हा तर १४ ग्रामीण रुग्णालये आहेत. सोलापूर शहरात १० नागरी आरोग्य केंद्रे असून ग्रामीणमध्ये ७७ आरोग्य केंद्रे तर ४३१ उपकेंद्रे आहेत. त्याठिकाणी दरमहा किमान एक लाखांपर्यंत रुग्ण उपचारासाठी येतात.पण त्यातील बहुतेक रुग्णांना पुढील उपचारासाठी सोलापुरातील सर्वोपचार रुग्णालयात जायला सांगितले जाते. त्यांच्यासाठी महात्मा फुले जनआरोग्य योजनेचाही पर्याय आहे, पण योजनेतील रुग्णालयांमध्ये असल्याने पुन्हा सर्वोपचार रुग्णालयाचीच पायरी चढावी लागते. मात्र, त्याठिकाणी क्षमतेपेक्षा दुप्पट रुग्ण आणि दुसरीकडे डॉक्टर्स आणि कर्मचाऱ्यांची पदे मोठ्या प्रमाणावर (४० टक्के) रिक्त आहेत. 'आयसीयू'ची संख्याही मर्यादित आहे.या पार्श्वभूमीवर, हातावर पोट असलेल्या सामान्य कुटुंबातील रुग्णाला मोठ्या आजारांवरील उपचारासाठी शेती, घर गहाण ठेवून किंवा विकून अथवा व्याजाने पैसे काढून उपचाराचा खर्च भागवावा लागतो, अशीही काही उदाहरणे आहेत. ही भयावह स्थिती बदलणार कधी, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

## जुन्या विडी घरकुलमध्ये साकारले विज्ञान केंद्र; विज्ञानावर आधारित विविध तंत्रसामग्री



**सोलापूर** – आपल्याला जे मिळालं नाही ते इतरांना मिळावं, त्यातून मुलांनी प्रगती करावे, भावी संशोधक घडावेत, या उद्देशाने अरविंद ताटीपामुल या सॉफ्टवेअर इंजिनिअरने हैदराबाद रोडवरील जुन्या विडी घरकुल मध्ये विद्यार्थ्यांसाठी विज्ञान केंद्राची सुरवात केली आहे. विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाबाबत जिज्ञासा निर्माण व्हावी व स्थानिक समस्यांवर उपाय शोधण्यासाठी विज्ञानाच्या साह्याने वेगवेगळे उपकरणे बनवण्याचे कौशल्य निर्माण व्हावे, हा देखील विज्ञान केंद्र चालू करण्याच्या पाठीमागच्या उद्देश आहे.या केंद्रात विज्ञानावर आधारित विविध तंत्रसामग्री उपलब्ध करण्यात आली आहे.आजी स्वर्गीय यशोदाबाई ताटीपामुल यांच्या स्मरणार्थ, यशोदा सायन्स अँड टेक्नॉलॉजी म्युझियम सुरू करण्यात आले, शिका व प्रयोग करा हे यांचे ब्रीदवाक्य आहे.आलेल्या प्रत्येक विद्यार्थ्याला त्याच्या आवडीच्या गोष्टीसाठी मार्गदर्शन करण्याची जबाबदारी केंद्रप्रमुख ममता मधुकर बोध्दूल यांच्याकडे दिली आहे. अरविंद मायक्रोसॉफ्ट या जगद्विख्यात कंपनीत सॉफ्टवेअर इंजिनिअर म्हणून काम करतो. सध्या तो अमेरिकेत असला तरीही तो विद्यार्थ्यांशी संवाद साधतो. विद्यार्थ्यांसाठी सकाळी ९ ते ११ व सायंकाळी ५ ते ८ या वेळेत व सुट्टीच्या दिवशी दिवसभर हे केंद्र उपलब्ध आहे, अशी माहिती त्यांचे वडील श्रीनिवास ताटीपामुल यांनी दिली आहे.

## इंग्रजांची चाकरी केली म्हणून यशोमती ठाकूर यांना ठाकुरांची पदवी-भाजप खा.अनिल बोंडे



**अमरावती**–काँग्रेस नेत्या आमदार यशोमती ठाकूर यांच्यावर टीका करताना खासदार अनिल बोंडे यांची जीभ घसरली. इंग्रजांची चाकरी केली म्हणून यशोमती ठाकूर यांना ठाकुरांची पदवी मिळाली, असे बोंडे यांनी म्हटले आहे. तसेच यांचा डीएनए हा इंग्रजांची चाकरी करणाऱ्यांचा आहे, असे म्हणत त्यांनी जोरदार माजी मंत्री यशोमती ठाकूर यांच्यावर जोरदार टीकास्त्र डागले आहे.दरम्यान पुढे बोलताना खासदार अनिल बोंडे म्हणाले की, इंग्रजांची चाकरी केली म्हणून यशोमती ठाकूरांना ठाकुरांची पदवी मिळाली. इंग्रजांची चाकरी करणाऱ्यांचा यांचा डिएनए आहे. काँग्रेसचा डीएनए महात्मा गांधीचा नाही तर तो फिरोज जहांगीर गांधीचा आहे. भाजपचा डीएनए हा भारताचा आहे. भाजपची ओबीसी यात्रा अमरावती जिल्ह्यामध्ये यशोमती ठाकूर यांच्या मतदारसंघ तिवसा येथे आली होती. त्यावेळी कार्यक्रमात बोलताना अनिल बोंडे यांनी हे वक्तव्य केले आहे.

यशोमती ठाकूर यांचे अनिल बोंडें यांना थेट भाटांकडील इतिहास दाखवून प्रतिउत्तर दिले आहे. १७०० साली सव्वा तोळ्याची एक अशा सव्वा लाख सोन्याच्या गिन्या या गोरगरीबांना दान केल्या म्हणून यशोमती ठाकुरांच्या कुटुंबाला ठाकुर ही पदवी दिल्याचा दावा यशोमती ठाकूर यांच्या घरी आलेल्या भाटांनी केला आहे. दुष्काळात आमच्या पूर्वजांनी दान केले त्यांच्या नोंदी आहेत. माझ्या पूर्वजांनी गरीबांना मदत केली हा इतिहास आहे. त्यांच्या वादग्रस्त वक्तव्यामुळे दंगली झाल्या आहे. खासदार म्हणून त्यांना जे मूळ काम त्यांना करायचे आहेत ते करत नाही. ओबीसीची जनगणना झालीच पाहिजे अशी मागणीही त्यांनी केली आहे.भाजप ओबीसी मोर्चाच्यावतीने राज्यात ओबीसी जागर यात्रा सुरु आहे. सोमवारी ही यात्रा अमरावतीमध्ये होती. यानिमित्ताने अमरावती शहर परिसरात मोठ्या प्रमाणात बॅनर लावण्यात आले होते. दरम्यान या यात्रेवरून यशोमती ठाकूर यांनी भाजपला टोला लगावला होता. निवडणुका आल्या की भाजपला असे धंदे सुचतात, अशा शब्दात यशोमती ठाकूर यांनी भाजपवर हल्लाबोल केला होता.

## ठाण्यातील बाजारपेठांना नवरात्रीची साज

**ठाणे**–गणेशोत्सवानंतर भाविकांना नवरात्रोत्सवाचे वेध लागतात. या नवरात्रोत्सवात नऊ दिवस चालणारा देवीचा जागर, त्याचबरोबर रात्री खेळला जाणारा दांडिया रास (गरबा) त्यामुळे तरुणाईदेखील या उत्सवाची आतुरतेने वाट पाहत असते. त्यातच नवरात्रोत्सावाच्या पार्श्वभूमीवर बाजारपेठांमध्ये गरबा खेळण्यासाठी विविध आकर्षक असे पोशाख, दागदागिने, पगडी बाजारात दाखल झाले आहेत. त्यामुळे ठाण्यातील बाजारपेठांमध्ये नवरंगी उत्साह पाहायला मिळत आहे. तरुणाईनेदेखील दागिने व पोशाख घेण्यासाठी बाजारपेठांमध्ये गर्दी केली आहे.यंदा गणेशोत्सवाप्रमाणे नवरात्रोत्सवाची धूमदेखील पाहायला मिळणार आहे. त्यात नवरात्रोत्सवात रंगणाऱ्या दांडिया रास दरम्यान उत्कृष्ट दांडिया खेळणाऱ्यास अनेक मंडळांकडून आकर्षक बक्षिसे देण्यात येत असतात. त्यात यंदाच्या दांडियात बक्षिसांची लयलूट करण्यासाठी तरुणाई सज्ज झाली आहे. त्याच पार्श्वभूमीवर बाजारपेठांमध्येदेखील विविध आकर्षक पोशाख, दागिने आणि विविध रंगाच्या व आकाराच्या पगड्या दाखल झाले आहेत. चनिया चोली, केडिया, धोती, नऊवारी घेरदार लेहेंगा, क्रॉप टॉप, जॅकेटसारख्या कपड्यांना मागणी आहे. यंदा काळा, गडद निळा आणि मेहंदी या तीन रंगांच्या कपड्यांना अधिक मागणी असल्याचे विक्रेत्यांनी सांगितले. मोठ्यांप्रमाणेच लहानग्यांचेदेखील उत्कृष्ट असे पोशाख पाहायला मिळत आहेत. यावर्षी अधिक वर्क केलेले आणि झालर असलेले लेहंगे बाजारात उपलब्ध झाले आहेत. तसेच मिक्स रंग असलेले दहा मीटरपेक्षा अधिक घेरदार असलेले घागरे पाहायला मिळत आहेत. चमकदार लेहंग्याची जागा आता कॉटनच्या लेहंग्याने घेतली आहे. गुजराती पारंपरिक पूर्ण पेहराव तरुणाईला जास्त पसंत नसल्याने नवीन पद्धतीच्या पोशाखास अधिक मागणी आहे, असे विक्रेत्यांकडून सांगण्यात येत आहे.

## ना.सुधीर मुनगंटीवार यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश

# सोयाबीन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा

## पंचनामा करण्याचे शासनाचे आदेश !

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

अस्मानी सुलतानी संकटात सापडलेल्या, आणि सतत अनिश्चिततेच्या छायेत असणाऱ्या शेतकऱ्यांना यंदा सोयाबीन पिकावरील कीड आणि रोगाच्या प्रादुर्भावाने त्रस्त केले; या शेतकऱ्यांच्या मदतीला राज्याचे वने, सांस्कृतीक कार्य आणि मत्स्यव्यवसाय मंत्री तसेच चंद्रपूरचे पालकमंत्री ना. सुधीर मुनगंटीवार धावून आले; ना. मुनगंटीवार यांनी या नुकसानग्रस्त शेतकऱ्याची व्यथा प्रत्यक्ष शेतावर भेटू देवून जाणून घेतली: या बाबताची वस्तुस्थिती मुख्यमंत्री, कृषिमंत्री यांना अवगत करून, विशेष पॅकेज जाहीर करण्याची विनंती केली. तसेच राज्याचे कृषिमंत्री व कृषीसचिवांना राज्यातील इतर जिल्ह्यातही अशाप्रकारे नुकसान झाले असल्यास त्या बाबत स्वतः लक्ष देवून आढावा घेण्याबाबत विनंती केली. या सातत्यपूर्ण पाठपुराव्याचे फलीत म्हणून शासनाने आता राज्यातील सोयाबीनच्या नुकसानग्रस्त क्षेत्राचे पंचनामे करण्याच्या सूचना दिल्या आहेत. अशा प्रकारचे मदत व पुनर्वसन विभागाचे आदेश सोमवारी ९ ऑक्टोबर रोजी निर्गमित झाले आहेत. या शासन निर्णयामुळे चंद्रपूरसह राज्यातील विविध जिल्ह्यातील शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे.जिल्ह्यातील सोयाबीन पिक वाढीच्या अवस्थेत असताना पडलेला पावसाचा खंड व अनियमित हवामान यामुळे जिल्हयात भात , सोयाबीन व कापूस या मुख्य पिकांवर किड व रोगाचा प्रादुर्भाव आढळून आला होता. कृषि विभागामार्फत नियमीतपणे पिकांचे किड व रोगांचे सर्व्हेक्षण करण्यात येऊन वेळोवेळी शेतकऱ्यांना आवश्यक ते तांत्रीक मार्गदर्शन करुन किड व रोग नियंत्रणाच्या उपाययोजना सुचविण्यात आल्या होत्या.सोयाबीन पिकावर किड व रोगाचा प्रादुर्भाव होवून पिक पिवळे पडत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर राज्याचे वने,सांस्कृतीक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री तथा चंद्रपूर जिल्हयाचे पालकमंत्री ना.सुधीर मुनगंटीवार यांनी राजुरा तालुक्यातील खामोना, पांढरपौनी, हरदोना (खु) येथे तातडीने जाऊन नुकसानग्रस्त क्षेत्राची प्रत्यक्ष पाहणी केली होती. त्यावेळी स्थानिक शेतकऱ्यांनी झालेल्या नुकसानीची माहिती दिल्यानंतर यासंदर्भात ना. मुनगंटीवार यांनी यंत्रणेला तात्काळ कार्यवाहीचे आदेश दिले व मंत्रालयात यासंदर्भात पाठपुरावा करून या शेतकऱ्यांना



भरीव आर्थिक मदत मिळावी यासाठी प्रयत्न सुरु केले होते.सोयाबीन पिकावर मुळकूज, खोडकूज, व रायझेक्टानिया एरीयल ब्लाईट या रोगांचा प्रादुर्भाव आढळून आला. त्याची तातडीने दखल घेत प्रधानमंत्री पिक विमा योजनेंतर्गत तातडीने मदत देण्याचे निर्देश पालकमंत्र्यांनी जिल्हा प्रशासनास दिले. त्या अनुषंगाने प्रधानमंत्री पिक विमा योजनेंतर्गत मध्य हंगामातील प्रतिकूल परिस्थिती या जोखिमेच्या बाबींतर्गत जिल्ह्यातील सोयाबीन पिकाचे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना विमा सरंक्षणाच्या २५ % रक्कम तातडीने देण्याबाबतची अधिसुचना निर्गमित करण्यात आली व तशा सुचना ओरीयंटल ईन्शूरंस कंपनीस देण्यात आल्या. मा. पालकमंत्र्यांनी सोयाबीन पिकाचे झालेल्या नुकसानीची कारणमीमांसा तसेच भविष्यातील व उपाययोजना आखण्यासाठी डॉ पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठांचे शास्त्रज्ञाची चमू पाचारण करून वस्तूस्थितीदर्शक अहवाल सादर करण्याबाबत सुचित केले. त्या अनुषंगाने डॉ पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठांचे शास्त्रज्ञांनी संयुक्त सर्व्हेक्षण करून शासनास अहवाल सादर केला.जिल्हयात पावसाची सुरुवात २२ जून पासून झाली असल्याने हंगामातील पेरण्या उशिराने म्हणजेच जूनच्या शेवटच्या आठवडयात सुरु झाल्या . जून महिन्यात सरासरीच्या ४७.९ टक्के , जुलै महिन्यात सरासरीच्या १५३.८ टक्के, ऑगस्ट महिन्यात सरासरीच्या ५२ टक्के व सप्टेंबर २०२३ महिन्यात सरासरीच्या ११३.६ टक्के , अशाप्रकारे अनियमीत स्वरुपाचा पाऊस पडलेला आहे.जिल्ह्यामध्ये पावसाचे २ ते ३ मोठे खंड पडल्यामुळे तसेच वातावरणातील व जमिनीतील वाढलेले तापमान व त्यानंतर आलेल्या पावसामुळे प्रामुख्याने चारकोल रॉट व रायझोक्टोनिया करपा या रोगाच्या वाढीस पोषक वातावरण निर्माण झाले. अश्या आकस्मिक वातावरण बदलामुळे जास्त कालावधीचे, वरील रोगांना संवेदनशील वाण जसे फुले संगम व फुले किमया हे वाण जास्त प्रमाणात बळी पडले. तसेच काही भागात सुरवातीच्या अवस्थेत खोडमाशी व चक्रभुंगा या किडींचा प्रादुर्भाव वाढल्यामुळे पिकाचे मुख्य खोड पोखरल्या जावून जमिनीतील अन्नद्रव्याचे वहन कमी झाले व झाडे अशक्त होवून शेंगा भरण्याच्या संवेदनशील अवस्थेमध्ये पाने पिवळी पडली, त्यामुळे सोयाबीन उत्पादकांना मोठा फटका बसला.पालकमंत्री ना.सुधीर मुनगंटीवार यांनी पुढाकार घेत शेकऱ्यांच्या हिताचे निर्णय घेणेबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे तथा कृषि मंत्री .धनंजय मुंडे यांना पत्राद्वारे विनंती केली होती. त्यामूळे चंद्रपूर जिल्ह्यासह राज्यातील सोयाबीन पिकाचे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या शेतावर पंचनामे होवून दिलासा मिळणार आहे.


## माता महाकाली महोत्सवासाठी जग प्रसिद्ध जागरणकार लखबीर सिंग लख्खा १९ ऑक्टोबरला चंद्रपूरात

### १९ ऑक्टोबर पासून सुरु होणार पाच दिवसीय माता महाकाली महोत्सव

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

१९ ऑक्टोबर पासून चंद्रपूरात सुरु होत असलेल्या पाच दिवसीय श्री माता महाकाली महोत्सवाची जय्यत तयारी सुरु करण्यात आली असून महोत्सवाच्या पहिल्याच दिवशी जगप्रसिद्ध देवी गीत जागरणकार लखबीर सिंग लख्खा चंद्रपूरात येणार आहे.

आमदार किशोर जोरगेवार यांच्या संकल्पनेतून श्री महाकाली माता समीतीच्या वतीने मागच्या वर्षी प्रमाणे यंदाही श्री महाकाली महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. यंदा सदर महोत्सव पाच दिवस चालणार असून या दरम्यान महाकाली मंदिर जवळच्या पटांगणात विविध सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या दरम्यान २० ऑक्टोबरला सारेगामा फेम निरंजन बोबडे यांच्या कार्यक्रमाचेही आयोजन करण्यात आले आहे.तर महोत्सवाच्या पहिल्याच दिवशी आपल्या देवी गीत



गायनाने जगात प्रसिध्द असलेले लखबीर सिंग लख्खा यांच्या देवी जागरण गायण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हे या महोत्सवाचे आकर्षण असणार असून सायंकाळी ७ वाजता या कार्यक्रमाला सुरवात होणार आहे. या कार्यक्रमाला महाकाली भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहण श्री महाकाली माता सेवा समीतीच्या वतीने करण्यात आले आहे.

**महाकाली महोत्सवाचे मंडप पूजन संपन्न**

१९ ऑक्टोबर पासून आयोजित श्री माता महाकाली महोत्सवासाठी महाकाली मंदिर जवळील पटांगणात महोत्सवा करिता येणा-या माताच्या भक्तांसाठी भव्य मंडप उभारण्यात येणार आहे. आज मंगळवारला महाकाली माता महोत्सवाच्या पदाधिका-यांनी विधीवत मंडप पुजन केले. त्यांनतर येथील मंडप उभारणीला सुरवात झाली आहे. या प्रसंगी श्री महाकाली माता सेवा समीतीचे उपाध्यक्ष अजय जयस्वाल, सदस्य बलराम डोडाणी, मोहित मोदी यांच्यासह इतर पदाधिका-यांची उपस्थिती होती.

## असंख्य महिला व पुरुष यांचा प्रहार मध्ये प्रवेश



**चंद्रपूर । प्रतिनिधी**

माजी राज्यमंत्री, दिव्यांग कल्याण मंत्रालय अध्यक्ष प्रहार जनशक्ती पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आ. बच्चू कडू यांच्या आदेशा नुसार नवनिर्वाचित जिल्हा प्रमुख शेरखान पठाण यांनी जिल्हा दौरा केला. त्यावेळी तालुक्यातील कार्यकारणी घोषित करण्यात आली.यात नागभीड तालुका प्रमुख म्हणून वृषभ खापरडे , ब्रह्मपुरी तालुका प्रमुख पदी ड.हेमंत उरकुडे यांची तर सावली तालुका प्रमुख पदी प्रफुल तुम्मे याची निवड करण्यात आली. या दौरा मध्ये तालुक्यातील अनेक महिला व पुरुषांनी प्रहार जनशक्ती पक्षात प्रवेश केला.

## खासदार अशोक नेते यांच्या हस्ते लिंबूपाणी घेऊन संतोष ताटीकोंडावार यांचे उपोषण मागे

### बांधकाम विभागाच्या कार्यालया समोर सुरु होते बेमुदत ठिय्या आंदोलन

अहेरी :- अहेरी तालुक्यात येत असलेल्या आलापल्ली ते अहेरी रोड बांधकामात झालेल्या भ्रष्टाचाराची चौकशी करून दोषींवर कडक कारवाई करावी तसेच संबंधित अधिकारी यांना निलंबित करावे व कंत्राटदार यांना काळया यादीत टाकावे . या रोडच्या दयनीय अवस्थेमुळे, चूक नसताना अनेक लोकांचे नाहक जीव गेले, पाठीच्या मणक्याचे त्रास सुरू झाले, गरोदर मातांना वेदना सहन कराव्या लागतात, शासकीय कर्मचारी, ज्येष्ठ नागरिक, शाळकरी मुलं-मुली इत्यादींना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत आहे, धुळीच्या त्रास वाढल्यामुळे अनेक लोक बिमार पडत आहेत.तसेच अहेरी- आलापल्ली हे मुख्य बाजारपेठ असल्यामुळे या मार्गाने जाणे हेच सगळ्यातमोठा विषय झाला असून या मार्गाचा वापर करण्यासाठी- आज सर्वसामान्य जनतेला विचार करावा लागतो आहे. यासर्व समस्यांचे निराकरण करण्यासाठी वारंवार निवेदने देऊनही कुठलीही कारवाई न झाल्याने सामाजिक कार्यकर्ते संतोष ताटीकोंडावर यांनी बांधकाम




विभागाच्या कार्यालया समोर बेमुदत ठिय्या आंदोलन सुरु केले होते .या आंदोलनाची दखल घेत खासदार अशोक नेते यांनी आंदोलन स्थळी भेट देत ताटीकोंडावार यांच्याशी चर्चा करून समस्या जाणून घेतल्या आणि संबंधित बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क करुंन मागणी मान्य केली व उर्वरित चौकशी करणार असे पत्र सदर विभागाच्या कर्मचाऱ्यांच्या मार्फत लेखी स्वरूपात पत्र देऊन सामाजिक कार्यकर्ते संतोष ताटीकोंडावार यांचे खासदार अशोक नेते यांच्या हस्ते लिंबूपाणी घेऊन उपोषण मागे घेण्यात आले.यावेळी भाजप पक्षाचे अहेरी तालुकाध्यक्ष विनोद अकंनपलीवार ,मोहन मदने, सागर डेकाटे,जावेद अली,दिवाकर गेडाम,अजय सोनूले,मधुकर रापरर्तीवार,अशोक आत्राम,व इतर पदाधिकारी कार्यकर्ते आणि गावकरी उपस्थित होते.

## सरकारने दिलेल्या गोळ्या औषधी गरोदर माता घेत नसल्याने बालकांचा मृत्यू-चित्रा वाघ

**नांदेड**–नांदेड जिल्ह्यातील डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयात झालेल्या २४ रुग्णांच्या मृत्यूप्रकरणात १२ नवजात बालकांचाही समावेश आहे. या बालमृत्यूवरून विरोधकांनी सरकारवर जोरदार टीका केली. सध्या राज्यात आरोग्य यंत्रणेतील गोंधळाचीच चर्चा आहे. नांदेड जिल्ह्यातील या मृत्यू प्रकरणाची दखल महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोगानेही घेतली आहे. या सर्व पार्श्वभूमीवर भाजपच्या नेत्या चित्रा वाघ यांनी गरोदर माता सरकारने दिलेल्या गोळ्या घेत नासल्याचा गंभीर आरोप केला आहे.

या संदर्भात चित्रा वाघ म्हणाल्या की, छोट्या बाळांना पेटीत ठेवतात. तिथे अनेक आई बसलेल्या होत्या. मी त्यांच्याशी बोलले त्या वेळी त्याचा व्हिडीओ देखील तयार केला. या मातांनी सांगितले की, जेव्हा सरकारच्या वतीने औषधी किंवा गोळ्या दिल्या जातात, पण त्या आम्ही खात नाही. पोषण आहार दिला जातो, आम्ही कधी खातो, कधी खात नाही.' असा दावा चित्रा वाघ यांनी केला आहे. डॉक्टरांनी ज्या गोळ्या घ्यायला सांगितल्या



त्या गोळ्या घेतल्या असत्या तर मुल तंदुरुस्त असते आणि तुमच्या मांडीवर खेळत असते, हे आम्ही त्यांना सांगितल्याचे चित्रा वाघ म्हणाल्या.सरकार औषधी आणि पोषण आहार पुरवू शकतो, त्यांना गिळायला लावू शकत नाही. अशा शब्दात चित्रा वाघ यांनी या घटनेमागील कारण स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. आशा सेविका लोह आणि इतर गोळ्या देतात. मात्र, गर्भवती माता या गोळ्या घेत नाही, याकडे आपल्याला लक्ष देण्याची गरज असल्याचे मत चित्रा वाघ यांनी व्यक्त केले आहे.

## पोलीस स्टेशन शेगावं येथे पार पडली मस्कऱ्या गणेश मंडळाच्या अध्यक्षांची कार्यशाळा



**वरोरा । प्रतिनिधी**

पोलीस स्टेशन शेगावं (बु) हद्दीत येणाऱ्या ग्रामीण भागातील मस्कऱ्या गणेश मंडळाच्या अध्यक्षांची कार्यशाळा १० ऑक्टोंबर रोज मंगळवारला पोलीस स्टेशन चे ठाणेदार अविनाश मेश्राम यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.

ठाणेदार अविनाश मेश्राम यांनी गणेश मंडळानी समाजिक उपक्रम आपल्या गणेश मंडळात राबवून समाजिक संदेश द्यावा असे प्रतिपादन केले. डीजे न लावता भजन मंडळ किंवा शाळेतील लहान मुलांच्या लेझीम पथकाने गणपती चे विसर्जन करावे. गावात एखादी अभ्यासिका सुरू करावी व आपल्या गावातील शातता भंग होणार नाही याची काळजी घ्यावी असे मार्गदर्शन केले. नवरात्रीत मंडळानी दांडिया आयोजित करून महिलांनी गरबा खेळावा. जेणेकरून नवरात्री मध्ये आपला तेवढाच वेळ आपल्या शरीराची हालचाल होईल आणी आपल्याला निरोगी राहता येईल असे ही ते म्हणाले.

## शेतकऱ्यांनी नोंदणी करतांना प्रत्यक्ष लाईव्ह फोटो अपलोड करणे बंधनकारक

### ३० नोव्हेंबरपर्यंत धान खरेदीसाठी शेतकऱ्यांना नोंदणी करण्याचे आवाहन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

पणन हंगाम २०२३-२४ खरीप मधील शासकीय आधारभूत खरेदी योजनेअंतर्गत शासन निर्णयानुसार जिल्ह्यातील धान खरेदी केंद्रावर १ ऑक्टोबर ते ३० नोव्हेंबर २०२३ पर्यंत धान खरेदीसाठी शेतकऱ्यांची नोंदणी सुरू झालेली आहे.शेतकरी नोंदणी करताना हंगाम २०२३-२४ पासून ज्या शेतकऱ्यांचा ७/१२ आहे, त्याच शेतकऱ्याचा प्रत्यक्ष लाईव्ह फोटो अपलोड करणे आवश्यक आहे, त्याशिवाय नोंदणी पूर्ण होणार नाही. ज्या शेतकऱ्यांना शेतमालाची विक्री करावयाची आहे, त्याच शेतकऱ्याने लाईव्ह फोटो अपलोड करण्यासाठी स्वतः खरेदी केंद्रावर उपस्थित राहून दिलेल्या कालावधीत म्हणजेच, दि. १ ऑक्टोबर ते ३० नोव्हेंबरपर्यंत खरेदी केंद्रावर मुदतीत धान खरेदीसाठी नोंदणी पूर्ण करावी, असे जिल्हा मार्केटिंग अधिकारी संजय हजारे यांनी कळविले आहे.

**हि आहेत खरेदी केंद्र:**

सावली तालुक्यातील श्री. किसान सह.तांदुळ गिरणी मर्या.व्याहाड (बु.), तालुका शेतकी खरेदी विक्री सह.संस्था,नागभिड आणि श्री. गुरुदेव सहकारी राईस मिल कोर्धा ता. नागभीड, चंद्रपूर जिल्हा कृषि औद्यो. सहकारी संस्था, चिमूर आणि चिमूर तालुका सहकारी शेतकी खरेदी विक्री नेरी ता. चिमूर, पोंभुर्णा/गोंडपिपरी तालुक्यातील कोरपना ता.ख.वि.समिती, गोंडपिपरी, चंद्रपूर जिल्हा कृषि औद्योगिक सह. संस्था, ब्रम्हपुरी, ब्रम्हपुरी खंड सहकारी शेतकी खरेदी विक्री संस्था आणि चंद्रपूर जिल्हा कृषि औद्यो. सहकारी संस्था बरडकिन्ही ता. ब्रम्हपुरी, बल्लारपूर, चंद्रपूर व राजुरा तालुक्यातील कोठारी येथील कोरपना ता.ख.वि.समिती कोठारी तसेच मुल व सिंदेवाही तालुक्यातंर्गत नवरगाव सहकारी राईस मिल, नवरगाव आणि सिंदेवाही सहकारी भात गिरणी, सिंदेवाही ही खरेदी केंद्र आहेत.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .